


*ताराराणी विद्यापीठाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्राचार्य पी. बी. पाटील बोलत असून छायाचित्रात प्राचार्य क्रांतीकुमार पाटील, माधवराव बुधले, रा. कृ. कणबरकर हे दिसत आहेत.* **छाया : जॉनी ट्रेनर.**

# संस्कारासाठी शिक्षण संस्थांनी पुढाकार घ्यावा

## व्ही. टी. पाटील प्रथम स्मृती कार्यक्रमात पी. बी. पाटील यांचे विचार

**कोल्हापूर, दि. १७ : सत्ता, संपत्ती आणि बुद्धी यांचा वापर समाजासाठी झाला पाहिजे. आज मात्र ते होत आहे असे दिसत नाही. त्यासाठी शिक्षणसंस्थांनी पुढाकार घेऊन हे संस्कार केले पाहिजेत, असे उद्‍गार प्राचार्य पी. बी. पाटील यांनी काढले.**

ताराराणी विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त ताराराणी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्राचार्य पाटील बोलत होते. कै. व्ही. टी. पाटील यांच्या नियोजित स्मारकाचे भूमिपूजन उद्योगपती माधवराव बुधले यांच्या हस्ते करण्यात आले.

ज्याच्याकडे बुद्धी आहे, सत्ता आहे किंवा संपत्ती आहे. त्यांना समाजात मोठेपणा मिळतो. त्यांच्या मोठेपणाच्या समाजाला किती फायदा होतो. हा खरा प्रश्न आहे, असे सांगून प्राचार्य पाटील म्हणाले की, स्वातंत्र्यानंतरच्या काळात परिस्थिती खुपच बदलली. बुद्धिमत्तेची दारे खुली झाली. सत्तेची दारे खुली झाली.त्याचा समाजासाठी किती वापर झाला ते पाहिले म्हणजे समाजासाठी त्याचा वापर करण्याचे दार मात्र बंद आहे असेच आढळून येईल. म्हणूनच आता बुद्धी, सत्ता आणि संपत्ती याचा समाजासाठी वापर करण्याचे संस्कार शिक्षण संस्थांनी करायला हवेत.

बुद्धी, सत्ता आणि संपत्ती एकत्र असतेच असे नाही.मात्र या सर्व गोष्टी व्ही. टी. पाटील यांच्याकडे होत्या आणि त्यांनी त्याचा आणि त्यातून मिळालेल्या मोठेपणाचा वापर हा समाजासाठी केला. कोल्हापूरच्या नावलौकिक वाढविण्यात ज्यांचा वाटा आहे. त्यामध्ये व्ही. टी. पाटील यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल असेही प्राचार्य पाटील म्हणाले.

रा. कृ. कणबरकर यांनी स्वागत केले.